प्रेस नोट दि. १५/०१/२०१८

**" Transforming Maharashtra"** या प्रकल्पांर्तगत सायबर गुन्हयांविषयी जनजागृती अभियानांतर्गत कार्यशाळा आयोजित असले बाबत.
( लोहमार्ग पोलीस मुख्या.खडकी दि. १७/०१/२०१८ रोजी १०.०० ते १२.०० )

—

वरील विषयान्वये सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, इंटरनेटने सर्वच क्षेत्रात प्रवेश केला आहे. वाढत्या इंटरनेटच्या वापराबरोबरच सायबर गुन्हेगारांनी गुन्हेगारीच्या नवनवीन पध्दती शोधून लोकांचा पैसा आणि खाजगी गोपनियता याला मोठा धोका निर्माण केला आहे. त्यांचा सामना करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस सक्षम आहे, परंतु यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाच्या **Transforming Maharashtra** या कार्यक्रमांतर्गत मा.पोलीस महासंचालक, म.राज्य, मुंबई यांनी सायबर गुन्हयांविषयी जनजागृती अभियान राबविण्याचे निश्चित केले आहे.

सदर कार्यक्रमात (१) सायबर गुन्हयांची ओळख, (२) सायबर गुन्हयांचे प्रकार, (३) सोशल मिडीया – फेसबुक, वॉटस्‌अ‍ॅप, टिव्ट्र, (४) बॅकींग व इन्शुरन्ससंदर्भातील गुन्हे, (५) सायबर गुन्हयाचे स्वरूप, (६) सायबर गुन्हा घडल्यानंतर काय कराल?, (७) सायबर गुन्हे रोखण्याच्या उपायोजना, (८) नागरिकांची कर्तव्य. असे विषय समाविष्ठ करण्यात आले आहेत.

सदर जनजागृती कार्यक्रमामध्ये स्थानिक नागरिक, महाविद्यालयीन युवक–युवती, व्यावसायिक, महिला, ज्येष्ठ नागरिक यांना आमंत्रीत करण्यात आले आहे.

सदर जनजागृती कार्यक्रम दिनांक १७/०१/२०१८ रोजी १०.०० ते १२.०० वा. लोहमार्ग पोलीस मुख्यालय खडकी येथे आयोजित करण्यात आले आहे.